महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in




## -:प्रेस नोट :-

दिनांक :- ०१/०७/२०२६

### " धरणगाव येथील घरफोडीचा गुन्हा उघड- स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; दोन आरोपी अटक, एक विधिसंघर्षग्रस्त बालक ताब्यात "

दिनांक ३१/०३/२०२६ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, फिर्यादी आपल्या कुटुंबासह दिनांक २३/०३/२०२६ रोजी देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले असता, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला व घरातील सोने-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण १,९८,०००/- रुपये किंमतीचा ऐवज चोरी करून नेला. सदर प्रकरणी धरणगाव **पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्र. ८३/२०२६ भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०५(अ), ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.**

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन **मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे** यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी **पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड** यांना सदर गुन्ह्याचा समांतर व सखोल तपास करून आरोपींचा शोध घेण्याबाबत तसेच गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्याबाबत आवश्यक मार्गदर्शन व सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड यांनी आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पथक तयार करून आरोपींचा तात्काळ शोध घेणे व गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्याबाबत आवश्यक सूचना दिल्या.

त्यानुसार पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली तसेच विविध अंगांनी तपास सुरू केला. सुरुवातीला कोणताही ठोस धागादोरा मिळून येत नसताना, पथकाने आपली गोपनीय माहिती यंत्रणा सक्रिय केली. गोपनीय माहिती तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अत्यंत कौशल्याने **आरोपीत नामे १) संदीप थोरात, वय २६ वर्षे, व्यवसाय- मजुरी २) कार्तिक उर्फ आबा महाजन, वय २० वर्षे, व्यवसाय - मजुरी, दोन्ही रा. एकता नगर, संजयनगर, धरणगाव, ता. धरणगाव, तसेच ०१ विधिसंघर्षीत बालकांस ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कैशल्यपुर्ण चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने, आरोपीत क्र. ०१ व ०२ यांना अटक करण्यात आले असुन, विधीसंघर्षीत बालकांस बालन्याय मंडळ यांचेकडे हजर करण्यात आलेले आहे.**

**सदर आरोपींकडून हस्तगत करण्यात आलेल्या चोरी केलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालीलप्रमाणे.**

**१. ६२,०००/-रुपये रोख रुपये**
**२. ३,०००/- रु किमतीचे ८९ ग्रॅम वजनाचे चांदीची लगड**
**३. १०,०००/- रु किमतीचे ३.१२० ग्रॅम चोन्याची लगड**

---------------------------------------------------------------------------

**एकुण ७५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

**सदरची कार्यवाही कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, श्री. श्री. अशोख नखाते, अपर पोलीस अधीक्षक जळगाव परिमंडळ, श्री. सुनिल पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी, चोपडा विभाग, चोपडा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड यांचे नेतृत्तवाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उप निरीक्षक संतोष पवार, पोहेकॉ/विष्णू बिऱ्हाडे, पोहेकॉ/दीपक माळी, पोहेकॉ/रविंद्र पाटील, पोकॉ/ईश्वर पाटील, पोकॉ/रावसाहेब पाटील, पोकॉ/महेश सोमवंशी या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

*******************************************************************************


महाराष्ट्र पोलीस
धरणगांव पोलीस स्टेशन
जि.जळगांव.
दुरध्वनी क्रं.२५१३३३